International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 35 March – April - 2026

# स्त्री कवयित्रींच्या मराठी वाङ्मयाचा सामाजिक व सांस्कृतिक अभ्यास

**स्वाती अर्जुन कुटे[1], डॉ. बाबासाहेब शेंडगे[2]**
[1]*अभ्यासक*
[2]*मार्गदर्शक*
*Corresponding Author – स्वाती अर्जुन कुटे*
**DOI - 10.5281/zenodo.20522341**

**प्रास्ताविक :**

आपल्या महाराष्ट्राला तर संतांची वैभवशाली परंपरा लाभली आहे. महाराष्ट्र भूमी ही 'संतांची भूमी' म्हणून सर्वदूर प्रसिद्ध आहे. विविध जाती धर्मातील, समाजातील संत मंडळींनी एकत्र येऊन ही चळवळ मोठ्या प्रमाणात उभी केली. त्याला सद्विचारांचे व समानतेच खत पाणी घातले. माणसातलं पशुत्त्व जाऊन माणूसपण यावे. माणसातून संतपण जागृत होऊन त्यांनी देवत्त्वाकडे जावे. त्याच्यातील सद्गुणांची वृद्धी व्हावी. अज्ञान विकाररहीत जीवन लोकांनी जगावे. म्हणून संत वाङ्मयाची निर्मिती करुन समाज सुधारण्याचे महान कार्यहाती घेतले. या वेगवेगळ्या जातीधर्मातील संतांनी आपापल्या व्यवसायाचे, समाजाचे, भावभावनांचे, सणवार, उत्सव, रीती, रिवार, परंपरा, रुढी, प्रथा, नाती-गोती, वैवाहिक संबंध, तत्कालीन समस्या या सर्व विषयांवर अभंग, रचना, गौळणी, पाळणा, भारुड, काकड आरती इ. रचना केल्या. संतांनी वेगवेगळे पंथ, संप्रदाय निर्माण करुन अध्यात्माचा मार्ग नामस्मरणातून सामान्य माणसासाठी खुला केला.

वारकरी संप्रदाय हा भागवत धर्म म्हणून सर्वज्ञात आहेच. त्यात संत ज्ञानेश्वर, संत निवृत्तीनाथ, संत सोपान, संत एकनाथ, संत तुकाराम, संत नामदेव अशा विविध संतांनी सामान्य माणसाला नामस्मरण व अभंगातून जीवनाकडे बघण्याची दृष्टी दिली. संत सोयराबाई, संत जनाबाई, संत मुक्ताबाई, संत वेणाबाई, संत मिराबाई, संत कान्होपात्रा, संत बहिणाबाई इ. संत कवयित्रींनी नामस्मरणाचे महत्त्व मानवाला अभंग, ओवी, पदे, या स्वरुपात सांगितले. स्त्री-संत सुद्धा समाजातील रुढी, परंपरा, बंधने झुगारुन नामस्मरणातून ईश्वर भक्तीत त्यांनी जीवन व्यतित केले. या संत वाङ्मयाची चळवळीत स्त्री संत कवयित्रींचे स्थान तितकेच महत्त्वपूर्ण होते.

संत साहित्यातील काही ठरावीक घटक, संत जनाबाई, संत सोयराबाई, संत मुक्ताबाई, संत कान्होपात्रा व संत बहिणाबाई यांच्या मराठी संतकवितेचा सांस्कृतिक, सामाजिकदृष्ट्या एकत्रितपणे अभ्यास करावयाचा निश्चय या शोधनिबंधात केला आहे. या शोधनिबंधात कालखंडानुसार वेगळेपण दाखवले जाणार आहे.

मध्ययुगीन कालखंडात तसेच यादव काळात महाराष्ट्रात अनेक धर्म व पंथ उदयाला आले. वारकरी संप्रदायातील स्त्री संत कवयित्रींनी दिलेल्या योगदानातून सामान्य माणूस ईश्वरभक्तीच्या मार्गी लागला. त्याला अनेक वेगवेगळ्या बंधनात अडकवले गेले. जनसामान्यांना नामस्मरणातून तसेच दैनंदिन कार्यातून ईश्वरभक्ती पर्यंत नेण्याचे महान कार्य स्त्री-संतांनी केले.

संत नामदेवांचा कालखंड हा सांस्कृतिकदृष्ट्या अतिशय संपन्न होता. त्यांच्या घरी आई-वडील, पत्नी, मुले हे सर्व अभंग रचत. ज्यांनी आपल्या घरची दासी, मोलकरीण संत जनाबाईला सुद्धा अभंग रचण्यास प्रोत्साहन दिले. यावरुन त्यांना अध्यात्मिक क्षेत्रात असणारे स्वातंत्र्य याची कल्पना आपणांस येते. संत कवयित्रींनी येणा-या संकटांना समर्थपणे तोंड देत नामस्मरणातून आपले जीवन घडविले एवढेच नव्हे तर स्वतः भगवंताला त्यांच्या मदतीसाठी धावून यावे लागले. त्यांच्या दैनंदिन कार्यात सहभागी व्हावे लागले. संत जनाबाई म्हणतात;

**'दळू कांडू खेळू। सर्व पाप ताप जाळू ।।**
**सर्व जीवनांमध्ये पाहू एक आम्ही होऊनी राहूं ।।**
**जनी म्हणे ब्रह्म होऊं। ऐसे सर्वांघटी पाहू।।'**
**(स.सं.गा.अभंग क्र. १८१)**

जनाबाईंना त्यांच्या प्रत्येक कार्यात विठ्ठल दिसत असल्याने त्यांचा कामाचा त्रास कमी होत. त्याची दासी म्हणून दैनंदिन कामे अतिशय हलकी होत.

संत जनाबाईंचे महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक व वाङ्मयीन कार्यात फार मोठे योगदान हे तेजस्वी हि-यासारखे आहे. सकल संत गाथेत जनाबाईच्या नावाने ३०० अभंग आहेत.

संत सोयराबाई ह्या संत चोखोबारायांच्या पत्नी होत्या. त्यांच्या काव्यात अर्थभाव उत्कटता, सामाजिकतेची जाणीव मोठ्या प्रमाणावर अभ्यासता येते. हिन वर्णातील असल्याने समाजात फारसे मानाचे स्थान मिळाले नाही.

**'आमची ती दशा विपरीत झाली।**
**कोण आम्हां घाली पोटामध्ये।।'**

हिन जातीत जन्माला येऊनसुद्धा नामस्मरणातून ईश्वर भक्ती केली. सामाजिक जाणीव, माणुसकीचा कटू अनुभव, नाम महात्म्य, अभंगातील उत्कटता हे त्यांचे लेखन विशेष. सकल संत गाथामध्ये यांच्या नावाने ६२ अभंग आहे.

संत ज्ञानदेवांच्या काळात तर संत साहित्याच्या सरितेला पूरच आला होता. सर्वावयाने लहान व कार्याने महान असणा-या संत मुक्ताबाईशिवाय संत साहित्य पूर्णच होऊ शकत नाही. संत निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान यांची लहान बहिण ती जन्मास आल्यापासूनच 'योगिनी' होती. तिच्या जीवनात सामान्य संसार नव्हताच, तर तिला विश्वाचा संसार करावयाचा होता.

निवृत्तीनाथांचे वैराग्य, ज्ञानदेवांची तेजस्विता आणि सोपानदेवांची चिंतनशिलता हे गुण तिच्या ठायी एकवटल्यामुळे मुक्ताईने विजेचा तेजस्वीपणा प्राप्त केला होता.

**'मुक्तजीव सदा होती पै नामपाठें।**
**तेचि रुप ईटे देखिले आम्ही ।।१।।**
**पुंडलिके विठ्ठल आणिला पंढरी।**
**आणूनि लवकरी तारी जन ।।२।।**
**ऐसे पुण्य केले एका पुंढलिकंची।**
**निरसिली जनाची भ्रमभुली ।। ३ ।।**
**मुक्ताई चिंतने मुक्त पै जाली।**
**चरणी समरसली हरिपाठे ।।४।।'**
**(स.सं.गाथा अभंग क्र. १)**

समाजाला, संतांना, योगियांना, संत ज्ञानदेवांना लहानगी मुक्ताई-मुक्ताबाई होऊन आईच्या नात्याने सांभाळते. सकल संत गाथेत मुक्ताईचे ५५ अभंग आहेत.

संत कान्होपात्रा एक गणिकेची (शामा) कन्या, विरक्ती, वैराग्य हा स्वायीभाव होता. ऐहिक सुखासाठी जीवनात स्थान नव्हते. विठ्ठलभक्ती-नामस्मरणातून विठ्ठलमय झालेली संत कवयित्री. गणिकेची कन्या असल्याने ईश्वर दर्शनाचीसुद्धा मुभा त्या काळी नव्हती. गणिकेची कन्या असल्याने बेदरच्या बादशहाचे सैनिक कान्होपात्रेस घेऊन जाण्यास आले तेव्हा तिने विठ्ठलाच्या चरणाशी धाव घेतली.

**'दीन पतित अन्यायी। शरण आले विठाबाई ।।१।।**
**मी तो आहे यातीहीन। न कळे काही आचरण ।। २ ।।**
**मज अधिकार नाही। भेटी देई विठाबाई।।३।।**
**ठाव देई चरणापाशी। तुझी कान्होपात्रा दासी।।४।।'**

तिच्या या व्याकूळ अवस्थेतच तिची प्राणज्योत मावळली. सकल संत गाथेमध्ये संत कान्होपात्रा यांचे २३ अभंग आहेत.

मध्ययुगीन कालखंडात स्त्रियांना समाजात फार महत्त्वपूर्ण स्थान नव्हते. स्त्रीला दुय्यम स्थान होते. स्त्रीने सतत बंधनात किंवा आश्रयाखालीच रहावे. तिला स्वतंत्र स्थान, विचार व मते मांडण्याचा अधिकार नव्हता. म्हणूनच वयाच्या तिस-या वर्षी बहिणाबाईंचा विवाह ३० वर्षाच्या रत्नाकर पाठकांशी झाला. अगदी खेळण्याच्या वयात त्या संसारिक विवंचनेत अडकल्या. त्या म्हणतात;

**'लोकांचिया मुली खेळती बोलकी। वाटे घ्यावे मुखी मज नाम ।**
**आणिक नावडे खेळ तो बालिश। नेणे तो विश्वास प्रकटला ।**
**नावडे फुगडी टिपरीयाची खेळ। असावे निश्चळ वाटे मना।**
**बहिणी म्हणे पूर्वी होते जे पदरी। तेची या संसारी प्रकटली।'**

बहिणाबाईंनी विरक्त मन आणि प्रापंचिक कर्तव्ये, यामध्ये झालेली यातनामय घुसमट व्यक्त केली आहे. संत कवयित्रींनी प्रत्येक वळणावर कन्या, भगिनी, पत्नी, माता, या अनेक भुमिका पार पाडल्या. त्यातही त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. समाजाचा व सांस्कृतिक बार्बीचा परिणाम निश्चितच त्यांच्या साहित्यावर झाला आहे. प्रत्येक कवयित्रीचे काव्य हे त्यातील सामाजिक व कौटुंबिक पार्श्वभूमीवर आधारले आहे.

स्त्री साहित्यिकांच्या साहित्यातून, अभंगातून त्यांच्या कालखंडाचा मागोवा घेता येतो. त्याचबरोबर त्यांचे जीवनकार्य, साहित्य या सर्वांचा त्यांच्या साहित्यलेखनावर झालेला परिणाम आपल्याला दिसून येतो. संत कवयित्रींची ईश्वरभक्ती-नामस्मरण, सुखी जीवनासाठी योग्य दिशा, कर्मातच ईश्वर याची साहित्यातून ओळख होते.